**जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजनेअंतर्गत वैरण व पशुखाद्य विकास कार्यक्रमांतर्गत वैरणीच्या उत्पादनात वाढ करण्यास प्रोत्साहन देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: डीएएचडी -१४०१२/१/२०२३-DAHD-AH४-( ६६५०८०)**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : - १८ ऑक्टोबर, २०२३

**वाचा :-** कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचा शासन निर्णय क्र. एफडीआर-२०२३/प्र.क्र.३९, दि. २१.०६.२०२३.

**प्रस्तावना :-**

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचा शासन निर्णय क्र. एफडीआर-२०२३/प्र.क्र.३९, दि. २१.०६.२०२३ अन्वये जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजनेंतर्गत वैरण व पशुखाद्य विकास कार्यक्रमांतर्गत ६ उपघटकांच्या अंमलबजावणीसाठी योजना राबविण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यामध्ये “शेतकऱ्यांच्या शेतावर वैरण उत्पादनासाठी प्रोत्साहनपर वैरण बियाणे वाटप” या उपघटकाचा समावेश आहे.

२. राज्यातील एकूण पशुधनाची संख्या व सरासरी उत्पादित होणारा वैरण व चारा यांचा एकत्रित विचार केला असता सुमारे ४४ टक्के इतकी चाऱ्याची तुट भासते. सरासरीपेक्षा कमी पर्जन्यमान झाल्यास चारा उपलब्धतेची परिस्थिती आणखी बिकट होते.

३. देशपातळीवरील दुधाळ पशुधनाची दुध उत्पादन क्षमता व राज्यातील दुधाळ पशुंची दुध उत्पादनाची क्षमता यात मोठी तफावत आहे. दुध उत्पादन वाढीसाठी दुधाळ पशुधनास पुरेशा प्रमाणात व पौष्टिक चारा देणे ही प्राथमिक गरज आहे. दुधाचे उत्पादन वाढविण्यासाठी चाऱ्याची तुट कमी करणे हा उपाययोजनेचा मुख्य भाग असून पशुधनास पुरेशा प्रमाणात पौष्टिक चारा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने पशुपालकांना चारा उत्पादनाकडे आकर्षित करण्यासाठी शासन निर्णय दि. २१.०६.२०२३ अन्वये देण्यात येत असलेल्या अनुदानाच्या रकमेत वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

४. शासन निर्णय क्र. एफडीआर-२०२३/प्र.क्र.३९, दि. २१.०६.२०२३ अन्वये जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजनेंतर्गत वैरण व पशुखाद्य विकास कार्यक्रमांतर्गत ०६ उपघटकांच्या अंमलबजावणीसाठी योजना राबविण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यामधील क्र. १ येथील “शेतकऱ्यांच्या शेतावर वैरण उत्पादनासाठी प्रोत्साहनपर वैरण बियाणे वाटप” या उपघटकांतर्गत १.३ येथे, “प्रति लाभार्थी एक एकरच्या क्षेत्रात वैरण उत्पादन घेण्यासाठी १०० टक्के अनुदानावर रु.१,५००/- (अक्षरी रु. एक हजार पाचशे मात्र) च्या मर्यादेत वैरणीच्या बियाणांचा / ठोंबांचा पुरवठा करण्यात यावा.” अशी तरतुद आहे. त्याऐवजी पुढील प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

१) प्रति लाभार्थी एक हेक्टरच्या (२.५ एकर) क्षेत्रात वैरण उत्पादन घेण्यासाठी १०० टक्के अनुदानावर रु.४०००/- (अक्षरी रु. चार हजार मात्र) च्या मर्यादेत वैरणीच्या बियाणांचा / ठोंबांचा पुरवठा करण्यात येईल.

२) एक हेक्टरच्या (२.५ एकर) पेक्षा कमी क्षेत्रात वैरण उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यास प्रत्यक्ष क्षेत्राच्या प्रमाणात अनुदान अनुज्ञेय राहील. (अनुदान मर्यादा रु. ४०००/- X प्रत्यक्ष लागवडी खालील क्षेत्र गुंठे/ १०० गुंठे)

५. योजनेच्या संदर्भातील दि. २१.०६.२०२३ मध्ये नमुद केलेल्या इतर अटी व शर्ती “जशाच्या तशा” लागू राहतील.

६. हा शासन निर्णय नियोजन विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र. ३९/२०२३/१४८१ दि. ०६/०९/२०२३, तसेच, वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. ५६६/२०२३/व्यय २, दि. १२/१०/२०२३ अन्वये व त्यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेताक २०२३१०१८१६२३२९८६०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

NIWRUTTI BHAGUJI MARALE

Digitally signed by NIWRUTTI BHAGUJI MARALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=AGRICULTURE AND ADF DEPARTMENT, 2.5.4.20=8a75c414ff50ce35220c63cd53d2eb1a99a474c02300beea74bb051c4c3c90a9, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=5C891DA87D2A4842558454524CC114BA5B2F67A2A80796592830D345500F15CC, cn=NIWRUTTI BHAGUJI MARALE
Date: 2023.10.18 16:26:45 +05'30'

**( नि.भा. मराळे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत -**

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. सर्व सन्माननीय विधानसभा / विधानपरिषद सदस्य
३. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. मंत्री (पशुसंवर्धन) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
६. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
७. अपर मुख्य सचिव (कृषी), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
११. आयुक्त दुग्धव्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, वरळी, मुंबई.
१२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.
13. निवड नस्ती - पदु-४